# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०२४

## मानसशास्त्र

**वेळ: ३ तास** **एकूण गुण : ८०**

**सूचना:**

(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पृष्ठावर करावा.

**प्र.१. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा:** (५) [२०]

(१) मानवतावाद हा विचार प्रवाह ________ यांनी मांडला.
(विल्हेम वुंट, कार्ल रॉजर्स, डॉ. सिग्मंड फ्रॉईड)

(२) बुद्धिगुणांकाचे सूत्र ________ यांनी सांगितले.
(बीने, स्टर्न, वेश्लर)

(३) शाईच्या डागाची चाचणी ________ या मानसशास्त्रज्ञाने विकसित केली.
(मरे, रोर्शा, मॉर्गन)

(४) इव्हान पॅव्हलॉव्ह हे अध्ययनाची ________ पद्धत स्पष्ट केल्याबद्दल ओळखले जातात.
(अभिजात अभिसंधान, साधक अभिसंधान, निरीक्षणात्मक)

(५) आपल्या संस्कृतीमध्ये एखाद्या व्यक्तीचे ________ म्हणजे त्याच्या कुटुंबाचे प्रतिबिंब आहे असा विचार केला जातो.
(बुद्धिमत्ता, वर्तन, दर्जा)

**(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या लावा.** (५)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | पडताळा | (१) | लढा किंवा पळा |
| (ब) | कॅटेल | (२) | ई. एल. थॉर्नडाईक |
| (क) | भीती | (३) | १६ व्यक्तिमत्त्व घटक (16 PF) |
| (ड) | छिन्नमनस्कता | (४) | सेलिग्मन |
| (इ) | सकारात्मक मानसशास्त्र | (५) | शास्त्राचे वैशिष्ट्य |
| | | (६) | दुभंगलेले मन |

**(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत, की 'चूक' ते लिहा.** (५)

(१) प्रयोगकर्ता ही अशी व्यक्ती जिच्यावर प्रयोग केला जातो.

(२) साहिलचे मानसिक वय १२ आहे आणि शारीरिक वय १० आहे तर साहिलची बुद्धिमत्ता सरासरीपेक्षा जास्त आहे.

(३) शास्त्रज्ञ, संगीतकार, कवी, फॅशन डिझायनर, वास्तुकला तज्ञ इत्यादी व्यक्ती सर्जनशील विचार करतात.

(४) तुम्ही सकारात्मक भावनांचा नियमित अनुभव घेतल्यास उत्साह कमी होईल.

(५) नि:पक्षपातीपणे ऐकणे हे कौशल्य मानसिक आरोग्यासाठीच्या प्रथमोपचारात आवश्यक असते.



Target Publications

(ड) **खालील प्रश्नांची प्रत्येकी 'एका' वाक्यात उत्तरे लिहा.** (५)

(१) 'सायन्शिया' या शब्दाचा अर्थ काय होतो ?

(२) भावनिक बुद्धिमत्तेची संकल्पना कोणी मांडली?

(३) औद्योगिक मानसशास्त्रज्ञ विशिष्ट व्यक्तीची विशिष्ट कामासाठी निवड करताना कोणत्या मुलाखत पद्धतीचा वापर करतात?

(४) एखाद्या वस्तूपासून अजिबात धोका नसतांना त्या वस्तूबद्दल वाटणारी अकारण भीती म्हणजे काय ?

(५) विस्तारण व निर्मिती (ब्रॉडन आणि बिल्ड) सिद्धांत कोणी मांडला ?

**प्र.२. खालील प्रश्नांची प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतीही पाच).** [१०]

(१) तद्नुभूती वाढवण्याचे कोणतेही दोन उपाय स्पष्ट करा.

(२) तर्कसंगत व्यक्तीची कोणतीही दोन वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(३) सामाजिक बुद्धिमत्ता म्हणजे काय?

(४) कार्ल युंगचा व्यक्तिमत्त्व सिद्धांत स्पष्ट करा.

(५) द्विध्रुवीय विकृती स्पष्ट करा.

(६) खिन्नताग्रस्त व्यक्तीच्या वर्तनातील कोणतेही चार बदल तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(७) आशावाद म्हणजे काय?

**प्र.३. खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही चार).** [१२]

(१) निरीक्षण पद्धत

(२) अवधान कक्षा

(३) भावनिक सुदृढतेचे दैनंदिन जीवनातील फायदे

(४) व्यसनासक्ती

(५) चिंताविकृती निर्माण होण्याची कारणे

(६) वृत्तेतिहास पद्धत

**प्र.४. खालील उदाहरणांवर आधारित प्रश्नांची केवळ शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही चार).** [८]

(१) अनिताने सातत्याने खेळाच्या सरावाचे प्रमाण वाढवले. त्यामुळे तिच्या खेळातील कौशल्यातही वाढ झाली, तर खेळातील सरावाचे प्रमाण व खेळातील कौशल्य यांत कोणत्या प्रकारचा सहसंबंध आढळतो?

(२) शेतकऱ्यांना हवामानाचे अंदाज सांगण्यासाठी हवामान खात्याद्वारे सॅटेलाईटचा वापर केला जातो, तर सॅटेलाईटचे कार्य बुद्धिमत्तेच्या कोणत्या प्रकारावर आधारित आहे?

(३) शेजाऱ्यांनी मोठ्या आवाजात सुरू केलेल्या रेडिओवरील गाण्यांमुळे सुनिताची अभ्यासातील एकाग्रता खंडीत झाली तर हे अवधानाच्या कोणत्या अंगाचे वर्णन आहे?

(४) अतुल स्वआदर व आत्मविश्वास वाढवण्यासाठी वृक्षारोपण उपक्रमात सहभागी झाला, तर भावनिक सुदृढता वाढवण्यासाठी अतुलने कोणत्या प्रकारच्या तंत्राचा उपयोग केला?

(५) रमेशला गेल्या वर्षभरापासून विभ्रम होतात, तो असंघटित बडबड करतो, विनाकारण किंचाळतो. ही कोणत्या मानसिक विकृतीची लक्षणे आहेत?

(६) पावसाच्या अनियमिततेमुळे निर्माण होणारी तीव्र पाणीटंचाईची समस्या कमी करण्यासाठी गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन शेतांत शेततळे बांधली. यांवरून नैसर्गिक आपत्तींवर मात करण्यासाठी गावकऱ्यांनी कोणत्या प्रकारच्या लवचिकतेचा वापर केल्याचे दिसून येते?

**प्र.५. खालील संकल्पना २५ ते ३० शब्दांत स्पष्ट करा (कोणत्याही पाच).** [१०]

(१) सजगता

(२) चेतापदशिता

(३) उबवण

(४) प्लुटचिक यांचे भावनाचक्र

(५) इंटरनेटचे व्यसन

(६) अंधश्रद्धा-मानसिक प्रथमोपचारातील अडथळा

(७) स्व-आदर-आनंद निश्चित करणारा घटक

Target Publications

**प्र.६. खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत लिहा.** **[१०]**

(१) संवेदनाची संघटन तत्त्वे आकृतीसह स्पष्ट करा:

मुद्दे : (i) समीपतेचे तत्त्व (ii) समानतेचे तत्त्व

(iii) सातत्यतेचे तत्त्व (iv) समावेशन तत्त्व

(२) पॉल अर्कमन यांनी सांगितलेल्या प्राथमिक भावना स्पष्ट करा.

मुद्दे : (i) सुख (आनंद) (ii) दु:ख

(iii) राग (iv) भीती

(३) आघात पश्चात तणाव विकृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

मुद्दे : (i) अर्थ (ii) धक्का अवस्था (शॉक स्टेज)

(iii) सूचना अवस्था (सजेस्टिबल स्टेज) (iv) पुनर्प्राप्ती अवस्था (रिकव्हरी स्टेज)

**प्र.७. पुढीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा.** **[१०]**

(१) बुद्धिमापन चाचण्यांचे प्रकार, फायदे व तोटयांसह स्पष्ट करा.

(२) व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणारे कोणतेही पाच घटक स्पष्ट करा.

Target Publications